तरुण भारत
शनिवार, २७ फेब्रुवारी २०१६

# ग्रंथमहोत्सवात नामवंत प्रकाशकांचे स्टॉल

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून गुरूवारी ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. ग्रंथमहोत्सवामध्ये भारतीय व परदेशी नामवंत कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ, उपहारगृह आदींचे ५० स्टॉल लावण्यात आले आहेत.

ग्रंथमहोत्सवामध्ये स्पर्धा परीक्षा, अभ्यासक्रमाची पुस्तके यांच्या खरेदीसाठी दिवसभर ग्राहकांची गर्दी दिसत होती. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पुस्तक स्टॉलवरील पुस्तकांची खरेदी केली. तसेच कुलगुरूंसह सर्व पदाधिकाऱ्यांनी ५० स्टॉलची पाहणी केली. शिवाजी विद्यापीठ प्रकाशन विभाग, मेहता बुकसेलर्स, स्पर्धा विश्व पुस्तकालय, अक्षर पुस्तकालय ग्रंथप्रदर्शन, करिअर स्पर्धा परीक्षा आदी बुकस्टॉलवर विविध विषयांची पुस्तके आहेत. सामाजिक, साहित्यिक, वैचारिक पुस्तकांचेही स्टॉल आहेत. महिला बचत गटातर्फे चहा, कॉफी, उपहाराचा स्टॉलही आहे. हे ग्रंथप्रदर्शन आज रविवारपर्यंत सुरू राहणार आहे. यावेळी अनिता शिंदे, बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, ग्रंथालय सहाय्यक प्रा. वैभव जाधव आदी उपस्थित होते.

पान ४ वर

### 'कॅरी' बॅग'ला पर्याय 'सारी' बॅग

ग्रंथ महोत्सवामध्ये शाहू महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटमार्फत एक लक्षवेधी स्टॉल लावण्यात आला आहे. यामध्ये विद्यार्थिनींनी जुन्या साड्यांपासून बनविलेल्या सारी बॅग विक्रीसाठी ठेवल्या आहेत. प्लास्टिक कॅरी बॅगला सारी बॅग हा उत्तम पर्यावरणपूरक पर्याय असून प्रदर्शनात सहभागी प्रकाशकांनी, ग्राहकांनी पुस्तकांसाठी सारी बॅग आवर्जुन वापराव्यात, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले आहे.



कोल्हापूर : ग्रंथमहोत्सवामध्ये पुस्तक स्टॉलचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबत बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड, अनिता शिंदे आदी.

# विद्यापीठात ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन

पान १ वरून

राष्ट्रीय अंध संघटना (नॅब कोल्हापूर) यांच्या वतीने कोल्हापुरमधील अंध विद्यार्थ्यांच्या वाद्यवृंदाचा 'ऑर्केस्ट्रा आयडियल स्टार्स' हा सांस्कृतिक कार्यक्रम लोककला केंद्रात सादर करण्यात आला. या कार्यक्रमात अंध विद्यार्थ्यांनी त्यांच्या गायन व वादन कौशल्याने उपस्थितांना मंत्रमुग्ध करून सोडले. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून या ऑर्केस्ट्राच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, असे सांगितले. ते म्हणाले, या संघटनेचे विद्यार्थी दिव्यांग असले तरी आंतरज्ञानाने जग पाहतात. म्हणून त्यांची दृष्टी विकाररहित आहे. म्हणूनच त्यांनी सुंदर कलाकृती निर्माण केली आहे. त्यांनी स्पर्श ज्ञानाने तयार केलेल्या ऑर्केस्ट्राकडे मनोरंजन नव्हे तर आदरभावाने पाहावे. यावेळी कोल्हापूर नॅबचे डॉ. एम. बी. डोंगरे, डॉ. एन. बी. शेख, वाद्यवृंद संयोजक दीपक कारंजकर उपस्थित होते. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी केले.

### निर्भया अभियानास प्रारंभ

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत १२५ विद्यार्थीनींचा सहभाग असणारे विशेष निर्भया अभियान शुक्रवारपासून सुरू झाले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत या अभियानास प्रारंभ झाला. या अभियानांतर्गत विद्यार्थीनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात येणार आहेत. याप्रसंगी विद्यार्थीनींनी काही प्रात्यक्षिके सादर केली.

### नूतन चहा कॉफी स्टॉलचे उद्घाटन

विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन विस्तारीत इमारतीसमोर शुक्रवारी सौ. अनिता शिंदे यांच्या हस्ते चहा-कॉफी स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी कॉफी व्हेंडिंग मशीनच्या माध्यमातून सेवा देण्यात येणार आहे. अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सकाळी ७ ते रात्री १०.३० वाजेपर्यंत ही सेवा उपलब्ध असेल, अशी माहिती डॉ. नमिता खोत यांनी दिली.